# संजय गांधी निराधार अनुदान योजना

उद्देश्य - राज्यात निराधार वृध्द व्यक्ति, अंध, अपंग, शारीरिक, मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ति व निराधार विधवांना अर्थसहाय्य देण्याच्या मूळ हेतूने संजय गांधी निराधार आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना सन १९८० पासून राबविण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पात्रता | :- | १) वय - ६५ वर्षापेक्षा कमी असावे.<br>२) उत्पन्न- प्रतिवर्षी रुपये २१,०००/- पर्यंत असावे.<br>३) .अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद इत्यादी प्रवर्गातील स्त्री व पुरुष.<br>४) क्षयरोग, पक्षाघात, प्रमस्तीष्कघात, कर्करोग, एड्स (एचआयव्ही +), कुष्ठरोग, सिकलसेल व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारामुळे स्वत:च्या चरितार्थ चालवू न शकणारे स्त्री व पुरुष<br>५) निराधार स्त्री/ पुरुष /तृतीयपंथी / निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या किंवा या योजनेखाली विहित केलेल्या उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी पोटगी मिळणाऱ्या महिला, परित्यक्त्या, देवदासी, अत्याचारित महिला व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला.<br>६) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न या योजनेखालील विहित उत्पन्ना पेक्षा कमी असल्यास ते कुटूंब<br>७) अनाथमुले १८ वर्षाखालील<br>८) किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| २) | आवश्यक कागदपत्रे | :- | (खालील तक्त्याप्रमाणे) |
| ३) | आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन | | १) एक व्यक्ती निराधार कुटूंबाला ६००/- प्रतिमहा. एकापेक्षा जास्त लाभार्थी निराधार कुटूंबाला रुपये ९००/- प्रतिमहा देण्यात येते.<br>२) संजय गांधी निराधारा अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षांचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| ४) | कार्यपध्दती | :- | अर्ज:- अर्जदार→ तलाठयांकडे→ तलाठी→ तहसिलदार/ तहसिलकार्यालय कडे → संगायो समिती समोर प्रत्येक तिमाहीस निर्णयासाठी ठेवावी. |

२) आवश्यक कागदपत्रे :-

| | |
|---|---|
| १) वयाचा दाखला | १) ग्रामपंचायतीच्या/नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला. किंवा<br>२) शिक्षापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा. किंवा<br>३) ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला. |
| २)उत्पन्नाचा दाखला | १) तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला (अर्जदाकडून रु . ५/- च्या (Court Fee Stamp) वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार किंवा<br>२) दारिद्ररेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा सांक्षाकित उतारा. |
| ३) रहिवाशी दाखला | १) ग्रामसेवक / तळाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला. किंवा<br>२) कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राहय धरण्यात येईल. |
| ४) अपंगाचे प्रमाणपत्र | १) अस्थिव्यंग, अंध, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद यांचे अपंगत्वाबाबत अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) यांचे प्रमाणपत्र |
| ५) असमर्थतेचा / रोगाचा दाखला | जिल्हा शल्यचिकित्सक (सिव्हील सर्जन) यांचे प्रमाणपत्र , शासकिय रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक यांनी दिलेला दाखलला. |
| ६) कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी किंवा शासन अनुदानित निवासगृहाचा आंतरवासी नसल्याबाबतचा दाखला | १) तहसिलदार किंवा ग्रामसेवक/तलाठी यांच्या शिफारशीवरुन दिलेला दाखला व महिला व बाल कल्याण अधिकारी यांनी दिलेला दाखला. |
| ७) अनाथ असल्याचा दाखला | १) ग्रामसेवक / मुख्याधिकारी / प्रभाग अधिकारी यांनी दिलेला व गटविकास अधिकारी / प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सांक्षाकित केलेला दाखला. |